# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२४

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### राज्यातील शेतकऱ्यांचा माल शासनाने हमीभावाने खरेदी करणेबाबत

**(१) १२३९१ (२०-०९-२०२०). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दुष्काळ, नापिकी व कोरोना यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यावर्षी आलेला शेतमाल घरातच पडून असल्याने आणि माल विक्रीस परवानगी नसल्यामुळे शेतमालाचे भाव खुल्या बाजारात घसरले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी ज्या शेतकऱ्यांचा माल कमी भावात विकला असेल त्यांचा माल शासनानेच खरेदी करावा तसेच त्यांना हमीभाव आणि खुल्या बाजारातील भावाचा फरक शासनाने द्यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पालकमंत्री यांना दिनांक २१ एप्रिल, २०२० रोजी वा त्यासुमारास घेतलेल्या खरीप हंगाम बैठकीदरम्यान तसेच मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक २८ एप्रिल, २०२० रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०८-१२-२०२३) :** (१) सन २०२०-२१ या कालावधीत खरीप हंगाम २०२०-२१ मध्ये गडचिरोली जिल्हयातील कोरची तालुक्यात महसूल व वन विभागाचा शासन निर्णय दि. २९/१०/२०२० अन्वये मध्यम स्वरुपाचा दुष्काळ जाहीर करण्यात आलेला होता, इतर जिल्हयात सर्वसामान्य स्थिती होती. रब्बी हंगामात राज्यात कुठल्याही जिल्हयात दुष्काळी परिस्थिती नव्हती.
(२) हे अंशत: खरे आहे.
शासनाने कोरोना विषाणूच्या प्रार्दभावाने जाहिर केलेल्या लॉकडाऊन कालावधीत संचारबंदी लागू केल्यामुळे बाजार समितीमध्ये आवक अल्प प्रमाणावर राहिली होती. तथापि, जिल्हयातील सर्व बाजार समिती शासन हमीभाव खरेदी केंद्र, खाजगी बाजार समिती सुरु ठेवण्याबाबत सूचना देण्यात येऊन लॉकडाऊन कालावधीत आलेल्या अडचणींची सोडवूणक करण्यास प्राधान्य देण्यात आले होते. तसेच हंगाम २०१९-२० मध्ये केंद्र शासनाने निश्चित केलेल्या हमीभावानुसार राज्यात उडीद, मूग, सोयाबीन, तूर व हरभरा खरेदी करिता १६३ खरेदी केंद्र सुरु करण्यात आली होती.
(३) अशा स्वरुपाचे निवेदन शासनास प्राप्त झाल्याचे उपलब्ध अभिलेखावरुन दिसून येत नाही.
मात्र हमीने शेतमाल खरेदी करण्याकरिता पणन महासंघाने कोरोना काळात सुध्दा खरेदी केंद्र सुरु - ठेवली होती. सदर सर्व खरेदी केंद्रावर शेतकरी - नोंदणी करण्यात आली असून नोंदणी झालेल्या सर्व - शेतकऱ्यांना एसएमएस पाठवून बोलविण्यात आले - होते. त्यामुळे नोंदणी झालेला कोणताही शेतकरी - हमीभावा खरेदीच्या योजनेपासून वंचित राहीलेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड जिल्हयातील आठवडी बाजार सुरु करण्याबाबत

**(२) ३५५८० (१२-०१-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात कोरोना आजाराचा प्रादुभाव नियंत्रणात आलेला असताना देखिल कोरोनामुळे मागील दोन वर्षापासून आठवडी बाजार व पशूधन खरेदी विक्री व्यवहार बंद असल्याने ग्रामीण अर्थ व्यवस्थेवर विपरीत परीणाम झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आठवडी बाजार व पशुधन खरेदी विक्री व्यवहार त्वरीत सुरू करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पत्रान्वये शासनाकडे केली आहे हे ही खरे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (३०-११-२०२३) :** (१) कृषि व पदुम विभागाच्या दि.०१.०९.२०२२ च्या परिपत्रकान्वये राज्यात उद्भवलेला गो व महिष वर्गीय पशुधनातील लम्पी चर्मरोगावर नियंत्रण ठेवण्याबाबत उपाययोजना करण्याच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. त्यानुसार बीड जिल्ह्यात गोवंशीय जनावरांतील लम्पी चर्मरोग या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे प्रतिबंधक उपाय म्हणून आठवडी बाजार तात्पुरत्या स्वरूपात बंद करण्यात आले होते.

(२) होय हे खरे आहे,

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आठवडी बाजार व पशुधन खरेदी विक्री व्यवहार सुरू करण्याबाबतची जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे मागणी केली होती.

(३) सदर लम्पी चर्मरोगाचा प्रादुर्भाव आटोक्यात आल्यानंतर जिल्हाधिकारी, बीड यांच्या दि.०२.०३.२०२३ च्या आदेशानुसार सर्व जनावरांचे आठवडी बाजार सुरू करण्यात आले असल्याचे, जिल्हा परिषद, बीड यांनी कळविलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाडा (जि. ठाणे) तालुक्यातील मांडवा-गारगाव व पीक-चिंचपाडा या जिल्हा मार्गावरील मो-या दुरुस्तीचे काम करण्याबाबत

**(३) ४७२७८ (११-११-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.ठाणे) तालुक्यातील मांडवा-गारगाव व पीक-चिंचपाडा या महत्वाच्या जिल्हा मार्गावरील अनेक मो-या मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे नादुरुस्त झाल्या असून मागील वर्षभरात या मो-यांच्या दुरुस्तीचे काम करण्यात आले नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील मो-यांची तातडीने दुरुस्ती न केल्यास पावसाळयात या मार्गावरील वाहतूक बंद होऊन ८ ते १० गावांतील नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार सदर ठिकाणच्या मो-यांची तातडीने दुरुस्ती करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२७-१२-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

सदर रस्त्यावरील क्षतीग्रस्त मोऱ्यांची दुरुस्ती पूर्ण केली असून सद्यस्थितीत रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यात टीईटी परिक्षेतील उमेदवारांची शिक्षकपदी नियुक्ती करणेबाबत

**(४) ४९६१५ (१८-०१-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात टीईटी परिक्षेतील ८६ हजार ४११ उमेदवार शिक्षकपदी नियुक्ती होण्याच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये शिक्षकांची ३१ हजार ४७२ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षकांची पदे रिक्त असतांनाही शिक्षक पदी नियुक्या होण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, शिक्षकांच्या तात्काळ नियुक्त्या करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०६-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) आयबीपीएस कंपनीमार्फत घेण्यात आलेल्या शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ चा निकाल प्रसिध्द झालेला असून, त्यामधील प्राप्त गुणांकनानुसार राज्यात पवित्र प्रणालीमार्फत शिक्षक भरतीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यास्तव सेवानिवृत्त शिक्षकांची तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर नेमणूक करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### धुळे शहरातील पांझरा नदीवरील बंधाऱ्यांच्या कामाबाबत

**(५) ५६८३७ (२६-०४-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरातून वाहणाऱ्या पांझरा नदीवर प्रभात नगर जवळ सन २०१७ मध्ये पूल वजा बंधारा मंजूर करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील ५ वर्षे उलटूनही पूल वजा बंधाऱ्याचे काम प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुंषगाने सदर बंधाऱ्याचे काम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२८-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर कामाबाबत हरित लवादाकडील दावा प्रलंबित असल्याने कामाच्या भौतिक प्रगतीवर परिणाम झाला. सद्यस्थितीत काम प्रगतीपथावर असुन लकरच पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नागपूर महामार्गावरील असलेल्या नांदगाव पेठ महामार्गावरुन सांडपाणी वाहून जाणऱ्या नाल्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(६) ५७७९७ (०३-०५-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास**

**ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महामार्गावरील असलेल्या नांदगाव पेठ येथील महामार्गापासून सांडपाणी वाहून जाणाऱ्या नाल्याचे बांधकाम अपूर्ण असल्यामुळे नागरिकांना व शेतकऱ्यांना त्रास होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदगाव पेठ येथील महामार्ग ते शासकीय वसाहती पर्यंत नाल्याचे बांधकाम त्वरीत पूर्ण करणेबाबतची मागणी पूर्ण न झाल्याने सदर विभागातील नागरीक व शेतकरी यांच्यामध्ये तीव्र नाराजी निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तदनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०७-१२-२०२३) :** (१) सदर महामार्ग केंद्र शासनाचे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारित येतो. हे अंशत: खरे आहे.

नांदगाव पेठ गावातील विविध समस्या समाविष्ट करुन सवलतदाराकडून सदर समस्यांचे निराकरण न झाल्यामुळे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे स्तरावर बैठक घेण्याबाबतचे विनंतीसह ग्राम पंचायतीचे पत्र प्राप्त झाले होते.

(२) अंशत: खरे आहे.

ग्रामसभेस सवलतदाराचे अधिकारी न आल्यामुळे व ग्रामपंचायतीच्या मागण्याबाबतचे पत्र सवलतदाराने न स्विकारल्याने व तोडगा न निघाल्याने स्थानिकांनी नाराजी व्यक्त केली.

(३) ग्रामपंचायतीच्या मागण्यांच्या अनुषंगाने सवलतदाराकडून अहवाल मागविण्यात आला. त्यानुसार नांदगाव पेठ येथे बोगदा दिलेला असून त्यामध्ये पथदिवे कार्यरत आहेत, व सवलत करारातील तरतुदीनुसार नालीचे बांधकाम पूर्ण केलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राष्ट्रीय महामार्ग ६६ च्या चौपदीकरणामुळे कशेडी (ता.खेड, जि.रत्नागिरी) गावातील खोंडेवाडी व पवारवाडी वस्त्या मुख्य रस्त्यांपासून वंचित राहणार असल्याबाबत**

**(७) ५७९९८ (२५-०४-२०२३). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्ग ६६ च्या चौपदीकरणामुळे कशेडी (ता.खेड, जि.रत्नागिरी) गावातील खोंडेवाडी व पवारवाडी वस्त्या मुख्य रस्त्यांपासून वंचित राहणार असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकरिता दोन वाडयांसाठी पूलाची मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीसंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०४-१२-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) कशेडी (ता.खेड, जि.रत्नागिरी) गावातील स्थानिकांनी खोंडेवाडी व पवारवाडी या दोन वाडयांना जोडणाऱ्या पुलांची मागणी केल्या नुसार केंद्र शासन, रस्ते वाहतूक व महामार्ग, नवी दिल्ली यांनी सदर प्रस्तावास मंजूरी दिली आहे सद्यस्थितीत निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोईट-वरोरा वणी- वरोरा (ता.वरोरा जि.चंद्रपूर ) येथील बायपास रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(८) ५८३३१ (२६-०४-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोईट-वरोरा वणी- वरोरा (ता.वरोरा जि.चंद्रपूर) येथील प्रस्तावित बायपास रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावित बायपासचे काम कधीपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे व ते अपूर्ण असल्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, सदर प्रस्तावित बायपास रस्त्याचे काम पूर्ण होण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०१-१२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर रस्त्याकरिता आवश्यक जमीन मार्च २०२३, मध्ये मे.वेस्टन कोल फील्डस लिमिटेड, माजरी यांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर रस्त्याचे काम मे.वेस्टर्न कोल फील्डस लिमिटेड, यांचे मार्फत डिसेंबर २०२३ पर्यत पूर्ण करणेचे नियोजन आहे.

(४) विलंब होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**अयोध्या येथे महाराष्ट्र भवन उभारण्याबाबत**

**(९) ६०४६७ (२५-०४-२०२३). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उत्तर प्रदेशचे मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र दौ-यांवर असतांना राज्याचे मा.मुख्यमंत्री यांनी उत्तर प्रदेशातील अयोध्यानगरीत महाराष्ट्र भवन उभारण्यासाठी आवश्यक असणारी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केल्यानुसार उत्तर प्रदेशचे मा.मुख्यमंत्री यांनी जागा उपलब्ध करून देण्यात येईल असे आश्वासन दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आश्वासनाच्या अनुषंगाने अयोध्या येथे महाराष्ट्र भवन उभारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०४-१२-२०२३) :** (१) व (२) होय, खरे आहे.

अयोध्या येथे महाराष्ट्र भवन उभारण्यासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करून देण्याबाबत उत्तर प्रदेश शासनाकडे मागणी करण्याचे नियोजन असून त्यानुसार पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भिवंडीतील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(१०) ६२९०९ (२५-०४-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी येथील रस्त्यांची दुरुस्तीकरिता प्रतिवर्षी कोटयवधी रुपये खर्च करूनही अनेक ठिकाणी दोन ते तीन फुटांचे खड्डे पडले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील नागरीकांना कंबरदुखी व मणक्याचे आजार होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व रस्त्यावरील खड्डे बुजवण्यासाठी प्रशासनामार्फत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२७-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

पावसाळयात रस्त्यावर पडलेले खड्डे वेळोवेळी भरुन रस्ता वाहतूकीस सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(२) नाही.

(३) सदर रस्त्यावरील दैनंदिन देखभाल व दुरुस्तीची कामे वेळोवेळी करुन रस्ता वाहतुकीस सुरळीत ठेवण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदार संघातील अल्पसंख्यांक बहुल क्षेत्राचा सर्वांगिण विकास करण्यासाठी निधी मिळण्याबाबत

**(११) ६४७१९ (३१-०८-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदार संघात अल्पसंख्यांक समाजाचा व अल्पसंख्यांक बहुल क्षेत्राचा विकास करण्यासाठी सुमारे ५ कोटी रुपयांचा निधी मिळावा याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १७ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास मंत्री अल्पसंख्यांक, यांचेकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघातील उपरोक्त समाजाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (१९-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रविकास योजनेंतर्गत अल्पसंख्याक बहुल नागरी वस्तीत विविध मुलभूत / पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरिता निधी मागणीचे अनेक प्रस्ताव प्राप्त झालेले होते. तथापि, उपलब्ध निधी विचारात घेऊन विकास कामे मंजूर करण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रत्नागिरी जिल्ह्यातील पाचल जि.प.गटात अर्जुना नदीवर साकव (फुटब्रिज) उभारण्याबाबत

**(१२) ६४८१८ (३०-०८-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील पाचल जि.प.गटात अर्जुना नदीवरील कारवली पाटकरवाडी आणि जामदा नदीवर हातगे-

मिळंद आणि काजिर्डा-कोळंब सह साकव माहे जुलै, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अतिवृष्टीत वाहून गेले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणचे साकव वाहून गेल्यामुळे विद्यार्थ्यांसह नागरीकांना पावसाळ्यात अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू साकवाचे काम तातडीने करण्यात यावे अन्यथा रत्नागिरी, जिल्हा परिषद कार्यालयापुढे दिनांक ४ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास उपोषण करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने सदर ठिकाणी वाहून गेलेले साकव पावसाळ्यापूर्वी तातडीने उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२७-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) निवेदन प्राप्त नाही.
(४) व (५) सदर ठिकाणी नवीन साकव बांधकाम करणेचे काम निधी, निकष व प्राथम्य क्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

## मुंबई-अहमदाबाद महामार्गावरुन जिल्हा मुख्यालयाकडे जाणाऱ्या मनोर-पालघर रस्त्याच्या चौपदरीकरणाबाबत

**(१३) ६४८८२ (३०-०८-२०२३). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हा निर्मितीच्या ९ वर्षानंतरही मुंबई-अहमदाबाद महामार्गावरुन जिल्हा मुख्यालयाकडे जाणाऱ्या मनोर-पालघर २० कि.मी. अंतरावर असलेल्या रस्त्याचे चौपदरीकरण अद्याप झाले नसल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत स्थानिक तसेच प्रवाशी सार्वजनिक बांधकाम मंत्री, पालक मंत्री, राष्ट्रीय महामार्ग विभाग, पालघर जिल्हा आदींकडे सातत्याने लेखी निवेदना द्वारे मागणी करत असूनही याकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्यासाठी केंद्रीय भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयामार्फत निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रस्त्याची पाहणी करुन रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी भूसंपादन करण्याबाबात शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच किती कालावधीत चौपदरीकरण पूर्ण करण्यात येईल,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२३-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही,
(४) सिन्नर घोटी-त्रिंबकेश्वर-मोरवाड-मनोर-पालघर राष्ट्रीय महामार्ग सन २०१८ मध्ये घोषित झालेला असून राष्ट्रीय महामार्ग मानकाप्रमाणे चौपदरीकरणेबाबतच्या कामाचा सविस्तर प्रकल्प अहवालाचे काम सुरु आहे. त्यामध्ये मनोर ते पालघर ही लांबी अंतर्भूत आहे. भूसंपादनाकरिता वार्षिक आराखडा सन २०२३-२४ मध्ये आवश्यक तरतूद करण्यासाठी रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, दिल्ली यांना प्रस्ताव सादर केलेला आहे. आवश्यक भूसंपादन ९० टक्के पर्यत पूर्ण झाल्यानंतर चौपदीकरणाचे काम हाती घेण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बेलुरा व कासारखेड (ता.खामगांव,जि.बुलढाणा) या दोन्ही गावांना जोडणाऱ्या रस्त्याचे भूसंपादन करुन रस्ता मंजूर करण्याबाबत**

**(१४) ६५४७८ (२३-०८-२०२३). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेलुरा व कासारखेड (ता.खामगांव,जि.बुलढाणा) या दोन्ही गावांना कायमस्वरुपी पक्का रस्ता नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दोन्ही गावांना जोडणारा रस्त्याचा प्रश्न मागील अनेक वर्षापासून भूसंपादनाअभावी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गावातील गावकरी रस्त्याच्या मागणीसाठी दिनांक ०५ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास आमरण उपोषण करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने सदरहू दोन्ही गावांना जोडणाऱ्या रस्त्याचे भूसंपादन करुन रस्ता मंजूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१८-१२-२०२३) :** (१) (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) सदरहू दोन्ही रस्ते जुलै-२०२३ च्या अर्थसंकल्पामध्ये मंजूर असून दोन्ही रस्त्यांची भूसंपादनाची कार्यवाही व सदर कामाची निविदा पूर्ण करुन लवकरच कामे हाती घेण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील हरभऱ्याला हमी भाव मिळणेबाबत**

**(१५) ६५५४५ (१२-०९-२०२३). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात हरबरा हे रब्बी हंगामातील प्रमुख कडधान्य असून हजारो शेतकऱ्यांचे अर्थकारण या पिकावर अवलंबून असून, आजमितीस हरभऱ्याला बाजारात किमान आधारभूत किमतीपेक्षा (हमीभाव) कमी दर मिळत आहेत त्यामुळे हरभरा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, रब्बी हंगाम २०२२-२३ मध्ये शासनाकडून हरभरा खरेदी करण्यात आला असून खरेदी प्रक्रिया वारंवार वेगवेगळी कारणे सांगून बंद करण्यात येत असल्यामुळे शेतकऱ्यांत नाफेड हरभरा खरेदीबाबत संभ्रम निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन हरभऱ्याला रास्त दर देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०८-१२-२०२३) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हंगाम २०२२-२३ करिता केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत दरानुसार राज्यात नाफेड च्या वतीने चना खरेदी करीता राज्य शासनाने दि.१६/०२/२०२३ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावास केंद्र शासनाने मान्यता दिली. त्यानुसार दि.२७/०२/२०२३ पासुन शेतकरी नोंदणी सुरु करण्यात आली. केंद्र शासनाने चना खरेदीकरीता ८.१० मे.टन इतके पोर्टलवर जिल्हानिहाय उदिष्ठ निश्चित केले होते. परंतु राज्यात चनाचे मोठया प्रमाणात उत्पादन झाल्यामुळे मुबलक प्रमाणात शेतकऱ्यांकडे चना उपलब्ध असल्याने मोठया प्रमाणात चना खरेदी झाली होती. त्यामुळे बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ व वर्धा या जिल्हयातील उदिष्ठ मुदतीपुर्वच पुर्ण झाले होते. तथापी नोंदणी केलेल्या उर्वरीत शेतकऱ्यांचे नुकसान होवु नये याकरीता नोंदणी केलेल्या व ज्यांच्याकडुन चना खरेदी शिल्लक आहे, अशा उर्वरित शेतकऱ्यांच्या संख्येच्या प्रमाणात जिल्हानिहाय अतिरीक्त खरेदीचे उदिष्ठ शासनाच्या दिनांक २७ एप्रिल २०२३, २२ मे २०२३ व ३१ मे २०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार निश्चित करण्यात आले होते. त्याप्रमाणे नोंदणी करण्यात आलेल्या सर्व शेतकऱ्यांना खरेदीसाठीचे SMS देण्यात आले व खरेदी प्रक्रिया पुर्ण करण्यात आलेली आहे. केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत दरानुसार प्रति क्विंटल ५३३५/- दराने एकूण २९,४०,६५९.११०८ क्विंटल हरभरा खरेदी करण्यात आलेला आहे. तसेच सुमारे १,४७,४३१ शेतक-यांनी सदर योजनेचा लाभ घेतलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिरोली-सांगली फाटा-अंकली हा चौपदरी रस्ता राष्ट्रीय महामार्गाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१६) ६५५५९ (३१-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरोली-सांगली फाटा-अंकली हा चौपदरी रस्ता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे सोपवून दोन वर्षे उलटूनही अद्यापही या मार्गाच्या कामाला सुरुवात झाली नसल्याचे दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या कामाला केव्हांपर्यंत सुरुवात करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (०७-१२-२०२३) :** (१) सदर महामार्ग केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारित येतो. हे खरे आहे.

(२) सदर रस्त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल प्रगतीपथावर आहे. रेखांकन व भूसंपादनाच्या प्रस्ताव भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नवी दिल्ली यांचेकडे माहे जानेवारी २०२३ मध्ये मंजूरीसाठी पाठविलेला आहे, त्यास मंजूरी प्राप्त झाल्यावर व निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मार्च २०२४ पर्यत प्रत्यक्ष काम सुरु करण्याचे नियोजन आहे.
(३) लागू नाही.

---

## कोल्हापूर-रत्नागिरी महामार्गावरील जुळेवाडी खिंडीतील मोरी व रस्त्याच्या कामांबाबत

**(१७) ६५५६० (३१-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर-रत्नागिरी महामार्गावरील जुळेवाडी (ता.शाहुवाडी) येथील खिंडीतील अवघड वळणावर असणारी मोरी, अरुंद रस्ता, अवघड वळण आणि मोरी दुरुस्तीसाठी दोन्ही बाजूस केलेले पंधरा फुटाचे खोदकाम यामुळे या रस्त्यावर वाहन चालवणे अत्यंत धोकादायक झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील मोरीचे बांधकाम व रुंदीकरणाचे काम मागील आठ वर्षापासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर मोरी दुरुस्तीचे काम पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०४-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

जुळेवाडी (ता.शाहुवाडी) खिंड असून तेथे तीव्र वळण असून मोरीच्या ठिकाणी रस्ता अरुंद आहे. तसेच मोरी दुरुस्तीसाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूस कोणतेही खोदकाम करण्यात आलेले नाही. मोरीवर अरुंद रस्ता असल्याने काही प्रमाणात त्याचा परिणाम अवजड वाहतूकीस होतो.

(२) हे खरे आहे.

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, यांनी रु.१९३.४३ लक्ष किंमतीच्या सदरचे तीव्र वळणाच्या सुधारणेच्या कामास माहे जाने. २०१६ मध्ये प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मंजूरी मिळालेली होती. परंतु सदर कामाच्या निविदा वारंवार काढूनही त्यास प्रतिसाद न मिळाल्याने नियमानुसार सदरचे काम रद्द झाले आहे.

(३) व (४) जुळेवाडी खिंडीतील मोरीच्या वळणाच्या ठिकाणी अपघात स्थळांची तात्पुरती सुधारणा करणे, या कार्यक्रमांतर्गत नियामक फलक व सुरक्षा बाबींच्या सर्व उपाययोजना सन २०२० अखेर बसविण्यात आलेले आहेत.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेकडून रत्नागिरी, कोल्हापूर राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६ वर चौपदीकरणाचे काम सुरु असून यामध्ये अवघड वळणे काढण्याचे प्रस्तावित आहे.

---

**तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या मानधनाची रक्कम दर महिन्याला वितरित करण्याबाबत**

**(१८) ६५८०४ (२८-०८-२०२३). श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), डॉ.किरण लहामटे (अकोले), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे १८ हजार सीएचबीधारक प्राध्यापक विविध महाविद्यालयात काम करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तासिका तत्वावरील या प्राध्यापकांना मानधनात वाढ करण्याची घोषणा करण्यात येऊन याबाबतचा शासन निर्णय दिनांक २७ मार्च, २०२३ रोजी वा त्या सुमारास निर्गमित केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तासिका तत्वावरील सहायक प्राध्यापकाकडे लेखी तासिकांपेक्षा प्रात्यक्षिक अभ्यासक्रमांचा कार्यभार सर्वाधिक असून १५-२०% लेखी अभ्यासक्रम प्रात्यक्षिकाचे असून प्रत्येक महिन्याला लेखिला ९०० रुपायांप्रमाणे ३६ तासांना ३२ हजार ४०० रुपये आणि प्रात्यक्षिकाला ३०० रुपये प्रमाणे १२ हजार ६०० रुपये मानधन मिळत असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(४) असल्यास, शासनाने मानधनात केलेली वाढ ही तुटपुंजी असल्याने तसेच सहा-सहा महिने मानधनाची प्रतिक्षा करावी लागत असल्याबाबत पारदर्शकता यावी म्हणून राज्यातील सर्व विभागीय उच्चशिक्षण सहसंचालकांनी, कोणत्या सीएचबीधारकाला किती रक्कम शासनाकडून महाविद्यालयांकडे वितरणासाठी पाठविण्यांत आला याबाबतची माहिती संकेत स्थळावर प्रसिध्द करावी व दर महिन्याला मानधन दिले जावे, अशी मागणी महाराष्ट्र प्राध्यापक संघटनेतर्फे शासनास करण्यांत आल्याचे दिनांक ०३ एप्रिल,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, लेखी आणि प्रात्यक्षिकाला असलेल्या वेगवेगळ्या मानधानाच्या तफावतीमुळे १२६०० - ३२४०० रुपये इतका मोठा फरक तासिकाधारकांमध्ये निर्माण झाल्याने वाढीव मानधन देण्याची मागणी त्यांच्यामार्फत होत असल्याचेही निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(६) असल्यास, तासिकाधारकांच्या मानधनाबाबत योग्य ती कार्यवाही होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबांची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२९-११-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त अशासकीय महाविद्यालयांमध्ये एकूण ८७९५ सीएचबीधारक प्राध्यापक कार्यरत आहेत.
(२) व (३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय, दिनांक २७ मार्च, २०२३ अन्वये उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय महाविद्यालये/ संस्था तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या तासिका तत्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाचे मानधनाचे दरात वाढ करण्यात आली आहे. सदर सुधारीत दरानुसार मानधन अदा करण्यात येत आहे.
(४) (५) व (६) महाराष्ट्र प्राध्यापक संघटनेची अशा प्रकारची मागणी प्राप्त झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. मात्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय, दिनांक १७/१०/२०२२ अन्वये तासिका तत्वावरील अध्यापकांची नेमणूक, विद्यापीठ मान्यता, दरमहा मानधन अदायगी याबाबत सुसूत्रता आणून नियुक्ती तसेच मानधन अदायगीबाबत कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयान्वये तासिका तत्वावरील अध्यापकांचे मानधन संबंधित महाविद्यालयामार्फत थेट बँक खात्यामध्ये जमा करणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर चुकीचे फलक लावणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत

**(१९) ६५८५१ (३०-०८-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम अनेक वर्षापासून प्रलंबित असून या महामार्गावर लावण्यात आलेल्या फलकांवर गावांची नावे चुकीची टाकण्यात आल्याने सदर बाब निदर्शनास आणून दिली त्यानंतर आता नव्याने लावण्यात आलेल्या फलकांवर गावाच्या दिशाच चुकीच्या टाकण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, गावे एका बाजूला आणि दिशा दुसऱ्या बाजूला दाखवण्यात आल्यामुळे प्रवाश्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी करुन फलकांवर चुकीची नावे आणि चुकीच्या दिशा दर्शविण्यास जबाबदार असलेल्या कंत्राटदार कंपनीवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (०७-१२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे,
सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखालील राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत पूर्ण झालेल्या लांबीमध्ये मानकाप्रमाणे गावांची नांवे, सूचना फलक लावण्यात आलेले आहेत. तथापि, या लांबीमधील काही गावांच्या नावांच्या मराठी, इंग्रजी शब्दांमधील स्पेलिंग व दिशादर्शक बाणांमध्ये चुका आढळून आल्या होत्या.
(२) गावे एका बाजूला आणि दिशा दुसऱ्या बाजूला दाखवण्यात आल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत होती, हे अंशत: खरे आहे. तथापि, त्यामध्ये तात्काळ दुरुस्ती करुन घेण्यात आलेली आहे.
(३) कंत्राटदारास वरीलप्रमाणे चूक दाखवून दिल्यानंतर फलकांमध्ये त्वरित आवश्यक दुरुस्ती केल्यामुळे कंत्राटदारावर

कारवाई केलेली नाही. यापुढे उर्वरित प्रगतीत असलेली कामे करतांना उपरोक्त प्रकारच्या चुका होणार नाहीत याची दक्षता घेणेबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) लागू नाही.

---

**पुणे जिल्हयातील वडगाव-लोणीकंद राष्ट्रीय महामार्गामुळे अनेक इमारती बाधित होणार असल्याबाबत**

**(२०) ६५९१३ (३१-०८-२०२३). श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयात वडगाव-लोणीकंद असा राष्ट्रीय महामार्ग घोषित झाला असून या रस्त्याच्या भूसंपादनाची कार्यवाही राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथे मागील तीन-चार वर्षात महानगरपालिकेच्या परवानगीने उभ्या राहिलेल्या काही इमारती बाधित होणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन येथील बाधितांचे पुनर्वसन करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२३-११-२०२३) :** (१) पुणे जिल्हयात वडगाव-लोणीकंद असा राष्ट्रीय महामार्ग घोषित झाला हे खरे आहे.राष्ट्रीय महामार्गावर भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकारण यांचे मार्फत भूसंपादनाची कुठलीही कार्यवाही सुरु नाही. सद्यस्थितीत हा महामार्ग पुणे महानगर पालिका व सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे अखत्यारित आहे.
(२) महानगर पालिकेकडून विचारणा केल्यानुसार, राष्ट्रीय महामार्गाचे सर्व नियम लागु राहतील असे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकारण यांचेकडुन कळविण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) लागू नाही.

---

**गोदाकाठ आणि निफाड ( जि.नाशिक ) तालुक्यातील करंजगांव -कोठुरे रस्त्याच्या निकृष्ट कामाबाबत**

**(२१) ६६००२ (०४-०९-२०२३). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोदाकाठ आणि निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील करंजगांव-कोठुरे रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याच्या तक्रारी स्थानिक नागरिकांनी संबंधित विभागाकडे केल्या असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागरिकांच्या तक्रारीनंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका-यांनी रस्त्याची पाहणी केली असता सदर रस्त्यांचे काम अत्यंत जलद गतीने करण्यात येत असल्याने रस्त्यावर खडडे पडल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन सदर रस्त्याचे निकृष्ट काम करणा-या ठेकेदारांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२८-११-२०२३) :** (१) निवेदन प्राप्त आहे.
(२) सदर रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम करारनाम्यातील अटी शर्तीनुसार व मानकानुसार करण्यात आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### परभणी-गंगाखेड रस्ताचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(२२) ६६८४३ (३१-०८-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी-गंगाखेड या रस्त्याची २०२ कोटी रुपये खर्च करुन दुरुस्ती करण्यात आली असताना उद्घाटनापूर्वीच या रस्त्याला भेगा पडल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या कामाकडे संबंधित विभागाच्या अधिका-यांचे दुर्लक्ष झाल्यामुळे सदर रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने निकृष्ट दर्जाचे काम करणारे कंत्राटदार व त्यांना पाठिशी घालणाऱ्या संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०४-१२-२०२३) :** (१) सदर महामार्ग हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखालील राष्ट्रीय महामार्ग विभाग, नवी-मुंबई यांचे अखत्यारित येतो.

अशंत: खरे आहे.

रस्त्याच्या बांधकामासाठी रु.१८९ कोटी इतका खर्च झालेला असून काही लांबीमध्ये काही ठिकाणी भेगा पडल्याचे निदर्शनास आले होते.

(२) हे खरे नाही,

पावसाळयामध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे सबग्रेड मध्ये पाण्याचा अंश वाढून काही ठिकाणी भेगा पडल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) भेगांची दुरुस्ती आयआरसी मानकानुसार कंत्राटदाराच्या स्वखर्चाने करण्यात आली आहे. सद्यस्थितीत दुरुस्तीचे काम १००टक्के पूर्ण झाले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबई-गोवा महामार्गावर वहूर (ता.महाड) येथील अनधिकृत दर्गा हटविणेबाबत

**(२३) ६६९०९ (०४-०९-२०२३). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरी करण्यासाठी या महामार्गावर असणारी सर्व बांधकामे हटविण्यात आली असून सदर रस्त्याच्या मधे असलेला वहूर (ता.महाड) येथील दर्गा अद्याप हटविण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनधिकृत दर्गा तातडीने हटविण्यात यावा अन्यथा शेजारी मंदिर बांधून गणपतीची स्थापना करण्यात येईल असा इशारा एका राजकीय पक्षाने प्रांताधिकारी, महाड यांच्याकडे माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुषंगाने उक्त अनधिकृत दर्गा हटविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०४-१२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) अनधिकृत दर्गा बांधकाम सुरु असताना शासनाच्यावतीने बांधकाम थांबविण्याच्या सूचना देऊन देखील बांधकाम न थांबविल्यामुळे दि.१३/०५/२०२२ व दि.२४/०५/२०२२, दि.०३/०६/२०२२ व दि. ०२/०६/२०२३ अन्वये लेखी नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत.

अनधिकृत दर्गाचे बांधकाम हटविणेबाबत संबंधित दर्गा कमिटी यांचे समवेत उपविभागीय अधिकारी, महाड यांचे दालनात माहे ऑगस्ट २०२३ मध्ये बैठकीमध्ये प्राथमिक चर्चा करण्यात आली असून त्यानुसार पुढील बैठक घेऊन पुढील कार्यवाही करणेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बीड शहरा नजीक बायपास रस्त्यावर स्लिप सर्व्हिस रोड तयार करण्याबाबत

**(२४) ६६९३८ (३०-०८-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड शहराच्या बाहेरुन १२ कि.मी. च्या बायपास रस्त्यावर स्लिप सर्व्हिस रोड तयार करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (बीड विधानसभा मतदारसंघ) यांनी राष्ट्रीय महामार्ग व राज्य शासनाच्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत वारंवार बैठका घेऊन पाठपुरावा करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या स्लिप रोड संदर्भात प्रस्ताव तयार करुन भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या सक्षम प्राधिकारी यांचे मंजुरी करीता सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावास मंजूरी देऊन केव्हापर्यंत कार्यवाही पूर्ण करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०४-१२-२०२३) :** (१) सदर महामार्ग भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारित येतो, हे खरे आहे.
(२) व (३) बीड शहराच्या बाहेरुन १२ कि.मी. लांबीच्या बायपास रस्त्यावर स्लीप सर्व्हीस रोड संदर्भातील प्रस्ताव सक्षम अधिकारी यांचे मंजूरीस्तव व वार्षिक योजना सन २०२३-२४ मध्ये समाविष्ट करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे कार्यालयामार्फत सादर केलेला आहे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे मुख्यालय यांचेकडे सदर प्रस्ताव विचाराधिन असून त्यांची मंजूरी प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोळथरे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथे धूपप्रतिबंधक बंधारा बांधण्याबाबत

**(२५) ६७०७७ (३०-०८-२०२३). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोळथरे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) या गावाला स्वच्छ सुंदर समुद्रकिनारा लाभलेला असून पर्यटन व्यवसायाला पूरक असला तरी समुद्र किनाऱ्यालगतच्या गावांना निसर्ग, तोक्ते, क्वारनामक वादळामुळे नारळी, पोकळी तसेच अन्य फळबागा प्रचंड प्रमाणावर नुकसान होत असून निवासी वस्तीला समुद्राच्या पाण्यापासून कायमचा धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी ग्रामस्थांनी तसेच ग्रामपंचायतीने सातत्याने बंदरे मंत्री, पालक मंत्री, रत्नागिरी जिल्हा आदीकडे लेखी निवेदनाद्वारे धूपप्रतिबंधक बंधारा बांधण्याबाबत मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय ,
(३) असल्यास, ग्रामस्थांनी अनेक वर्षापासून उक्त मागणी केलेली असतानाही शासनाकडून या बंधाऱ्याच्या बांधकामास मंजूरी देऊन काम हाती न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदरहू समुद्र किनारपट्टी लगतच्या संरक्षण म्हणून धूपप्रतिबंधक बंधाऱ्याचे महत्व अधिक अधोरेखित झाले असताना अनेक वादळामुळे तसेच दरवर्षीच्या उधाणामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी कोळथरे गावाच्या समुद्र किनारपट्टीवर विनाविलंब धूप प्रतिबंधक बंधारा उभारणीचे काम हाती घेवून लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२३-११-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) कोळथरे ता.दापोली येथे धूपप्रतिबंधक बंधारा बांधणेचे कामासाठी समुद्र धूपप्रतिबंधक बंधारे बांधणे या योजनेंतर्गत सन २०२२-२३ मध्ये रु.४.२०कोटी इतक्या अंदाजित रकमेच्या कामास मंजूरी देण्यात आली आहे. सदर कामाचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सर्वेक्षण करुन काटछेद प्राप्त करणेसाठी सी.डब्ल्यु.पी.आर.एस. पुणे यांचेकडे पाठविण्यात आला आहे.

कोकण आपत्ती सौम्यीकरण अंतर्गत सदर कामास रु.५.१७ कोटी इतक्या अंदाजित रक्कमेच्या कामास मंजूरी देण्यात आली असून सदर कामाचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी महसूल (आपत्ती व व्यवस्थापन) विभागाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हर्णे-पाजपांढरी (ता.दापोली,जि.रत्नागिरी) रस्त्याच्या दुरुस्तीबाबत

**(२६) ६७०७८ (३१-०८-२०२३). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हर्णे-पाजपांढरी (ता.दापोली,जि.रत्नागिरी) रस्त्याची दुरवस्था झाल्याने प्रवाशी व वाहन धारकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असून मनुष्यहानी व मालमत्तेचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्याचे मजबुतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करण्याचे काम विनाविलंब हाती घेवून पूर्ण करण्याची मागणी ग्रामस्थ तसेच वाहन चालकांनी गत १ वर्षापासून सातत्याने सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा. पालकमंत्री, रत्नागिरी जिल्हा, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, चिपळूण, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, दापोली यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन हर्णे-पाजपांढरी रस्त्याच्या मजबुतीकरण, खडीकरण व डांबरीकरणाचे काम विनाविलंब हाती घेऊन पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२८-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) निवेदन प्राप्त नाही.

(३) अडखळ हर्णे लाडघर प्रजिमा-८ या रस्त्यावर आवश्यक लांबीमध्ये रस्ता सुधारणा करणेचे रक्कम रु.२५० लक्षचे मंजूर काम सद्यस्थिती प्रगतीत असून एप्रिल २०२४ पर्यन्त पूर्ण करणेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोनाळे (ता.वाडा, जि.पालघर) येथील देसई-खर्डी या रस्त्याच्या निकृष्ट बांधकामाबाबत

**(२७) ६७२४५ (३१-०८-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनाळे (ता.वाडा,जि. पालघर) येथील देसई ते खर्डी या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामात डांबर न वापरता दगड पावडरमध्ये काळे तेल भेसळ करुन रस्त्याचे काम करीत असल्याने सदर बाब ग्रामस्थांनी उप अभियंता यांच्या निदर्शनास आणून आंदोलन करुन सदर काम बंद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन याकडे दुर्लक्ष करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, संबंधित जबाबदार इतर अधिकारी व ठेकेदार यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२७-१२-२०२३) :** (१) सदरचे काम ग्रामस्थांनी बंद केले होते, हे खरे आहे.
(२) सदरचे काम करारनाम्यातील तरतूदीनुसार प्रगतीत असून मार्च, २०२४ पर्यंत पूर्ण करणेचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चिखली, बुलढाणा, मोताळा , मलकापूर या तालुक्यांना जाण्यासाठी नवीन रस्ता तयार करण्याबाबत

**(२८) ६७३८२ (३०-०८-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्गावरुन बुलढाणा जिल्हामध्ये सिंदखेडराजा तालुक्यामध्ये पळसखेड ( मलकदेव) येथे चिखली, बुलढाणा , मोताळा व मलकापूर या तालुक्यांना जोडण्यासाठी इंटरचेंज तयार करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास ,सदर इटरचेंज ऐवजी जवळखेड मार्गे ते असोला फाटा हे अंतर अंदाजे ८ कि.मी. इतके आहे. तसेच या इंटरचेंज पासून पळसखेड झाल्टा मार्गे असोला फाटा येथे गेले असता हे अंतर सुध्दा ८ कि.मी. इतके असल्याने चिखली, बुलडाणा, मोताळा , मलकापूर या तालुक्यांना जाण्यासाठी १५ कि.मी अंतर कमी होवू शकेल व २० ते २५ मिनीटे इतका वेळ वाचू शकेल, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत एक नवीन रस्ता तयार करण्याबाबत सभागृहात उपस्थित केलेल्या प्रश्नास सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचे सोबत बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन मंत्री यांनी राज्य उत्पादन शुल्क शासनाच्या वतीने सभागृहात दिले होते, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१८-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अंश:त खरे आहे.
इंटरचेंज पासून जऊळखेड मार्गे ते असोला फाटा (१२ कि.मी.) किंवा इंटरचेंज पासुन पळसखेड झाल्टा मार्गे असोला फाटा (९ कि.मी.) हे अस्तित्वातील प्रजिमा, इजिमा, ग्रामा दर्जाचे रस्ते असून संबंधित यंत्रणांनी सुधारणा केल्यास सिंदखेडराजा इंटरचेंज ते असोला फाटा या मधील अंतर जवळपास १३ ते १६ कि.मी. कमी होऊन वेळ वाचू शकतो.
(३) व (४) होय, हे खरे आहे.
याबाबत मा.मंत्री महोदयांच्या स्तरावर बैठक घेऊन त्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे येथील कृषि उत्पन्न बाजार समिती (मार्केट यार्ड) परिसरात पायाभूत सुविधा पुरविण्याबाबत

**(२९) ६७४०६ (२४-०८-२०२३). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील कृषी उत्पन्न बाजार समिती (मार्केट यार्ड) परिसरात पिण्यासाठी पाणी, चांगला रस्ता, स्वच्छ स्वच्छतागृहे यांसारख्या पायाभूत सुविधा मिळत नसल्याची बाब दिनांक ११ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे व्यापारी, कामगार, खरेदीदार, शेतकरी वर्ग हैराण झाला असून त्यांच्यामध्ये तीव्र नाराजीची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने माहिती घेऊन मार्केड यार्ड परिसरात पायाभूत सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२८-११-२०२३) :** (१) ,(२) व (३) हे खरे नाही.

पुणे येथील कृषी उत्पन्न बाजार समिती (मार्केट यार्ड) परिसरात पायाभुत सुविधांच्या अनुषंगाने पिण्याच्या पाण्याकरीता पाणपोया, सुरळीत वाहतुक होण्याकरीता रस्ता डांबरीकरण व ३९ स्वच्छतागृहांची उभारणी केलेली असून त्याबाबत देखभाल व दुरुस्ती बाजार समितीकडून वेळोवेळी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मोझरी-तळेगांव-पांधण (ता.तिवसा, जि.अमरावती) रस्त्यावर पूल बांधण्याबाबत**

**(३०) ६७९५४ (३१-०८-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोझरी बायपास (Point No.६) अंतर्गत मोझरी-तळेगांव-पांधण (ता.तिवसा, जि.अमरावती) रस्त्याजवळील पुलाचे बांधकाम ३० फूट करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, अमरावती यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सुरक्षित वाहतुकीच्या दृष्टीकोनातून पुलाचे बांधकाम वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (२३-११-२०२३) :** (१) सदर राष्ट्रीय महामार्ग भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारित येतो.

हे खरे आहे.

(२) सदर पुल सद्यस्थितीत प्रगतीत असलेल्या मोझरी बायपास येथे स्थित आहे. स्थानिक लोकांचे /लोक प्रतिनिधी यांच्या मागणीनुसार शेंदोळे खुर्द गावाजवळ बॉक्स कलर्व्हटचा आकार वाढवण्याच्या प्रस्तावास माहे जून २०२३ मध्ये भारतीय राष्ट्रीय महामार्ग, नवी दिल्ली यांनी मान्यता दिली आहे व त्यानुसार काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**घोटी-सिन्नर, भंडारा, नगरला (जि. नाशिक) जोडणाऱ्या देवळे पुलाची दुरुस्ती करण्याबाबत**

**(३१) ६८४५३ (३१-०८-२०२३). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील घोटी-सिन्नर-भंडारदरा-नगरला जोडणारा देवळे पूल जीर्ण झाल्याने त्याची दुरुस्ती करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाचे प्रकल्प संचालक यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०७-१२-२०२३) :** (१) सदर महामार्ग हा केंद्र शासनाचे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारित येतो.

हे खरे नाही.

याबाबत कुठलीही मागणी अथवा निवेदन संबंधित प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नाशिक यांना प्राप्त न झाल्याचे त्यांनी कळविले आहे. तथापि, सदर महामार्ग सन २०२० मध्ये भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण

यांना हस्तांतरण होण्यापूर्वी या पुलाची दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सन २०१६-१७ मध्ये केलेली असून सद्यस्थितीत सदर पुल हा सुस्थितीत आहे व वाहतूक वर्दळ सुरळीत सुरु आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) लागू नाही.

---

**तुळजापूर-नांदेड ते नागपूर (जि.नांदेड) या महामार्गाच्या रस्त्याच्या कामांमध्ये अनियमिता झाल्याबाबत**

**(३२) ६८८६९ (३१-०८-२०२३). श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तुळजापूर नांदेड ते नागपूर (जि.नांदेड) या महामार्गाच्या कामांमध्ये अनियमिता झाली असून मुरम भरावाच्या कामात माती व माती मिश्रित मुरमाचा वापर केला असल्यामुळे या रस्त्यांची दुरवस्था झाली असल्याची बाब माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त कामाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०४-१२-२०२३) :** (१) सदर महामार्ग भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारित येतो.
हे खरे नाही.
सदर महामार्गाचे नांदेड जिल्हयातील काम प्रगतीपथावर असून या कामात मुरुम भरावाच्या कामात माती व माती मिश्रीत मुरुमाचा वापर झाल्याचे आजतागायत निदर्शनास आले नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लातूर ते शिरुर अनंतपाळ (जि.लातूर) राज्य महामार्ग क्रमांक १४५ वरील बाभळगाव ते मुशिराबाद रस्त्याच्या दुरुस्तीबाबत**

**(३३) ६८९५१ (३१-०८-२०२३). श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर ते शिरुर अनंतपाळ (जि.लातूर) राज्य महामार्गावरील (क्रमांक १४५) बाभळगाव ते मुशिराबाद रस्त्याची दुरवस्था झाल्याने अपघातांचे प्रमाण वाढले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या महामार्गावरील मुशिराबाद-बोरी-सेलू-बाभळगाव दरम्यानच्या रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याने असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याची कायमस्वरुपी दुरुस्ती करण्यासाठी नागरिकांनी वारंवार संबंधित विभागाकडे निवेदने देऊन तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनाक ०६ जून २०२३ वा त्यादरम्यान सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांना देखील याबाबत पत्रान्वये कळविले असूनही सदर रस्त्याची दुरुस्ती होत नसल्याने दिनांक १५ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास सार्वजनिक बांधकाम विभाग, बांधकाम भवन, लातूर येथे आमरण उपोषण केले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने सदर मार्गाची दुरुस्ती होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२८-११-२०२३) :** (१) रस्त्याच्या दुरावस्थेमुळे अपघाताचे प्रमाण वाढल्याची नोंद नाही.
(२) वार्षिक देखभाल दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत सदर रस्त्यावरील देखभाल व दुरुस्तीची कामे वेळोवेळी करुन सदर रस्ता

वाहतुकीस सुरळीत ठेवण्यात आला आहे.
(३) परिसरातील ग्रामस्थांनी दि.५/६/२०२२ रोजी रस्त्याच्या दुरुस्तीबाबत निवेदन देऊन दि.१५/६/२०२२ रोजी उपोषण केले होते, हे खरे आहे.
(४) सदर रस्त्याच्या कायमस्वरुपी दुरुस्तीची कामे निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षणशास्त्र (बी.एड.) महाविद्यालयांना शासनामार्फत अनुदान देण्याबाबत

**(३४) ६८९८७ (२८-०८-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुनिल शेळके (मावळ), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाने विनाअनुदानित धोरण दिनांक २४ नोव्हेंबर, २००१ नंतर स्वीकारले असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, २००१ पूर्वीची सर्व महाविद्यालये अनुदानास पात्र असून दिनांक २४ नोव्हेंबर, २००१ च्या महाविद्यालयांना अनुदान देण्याच्या धोरणानुसार राज्यातील २००१ पूर्वीची कला, विज्ञान, वाणिज्य व विधी महाविद्यालय अनुदानित झालेली आहेत. तसेच नंतरच्या काळात व्यावसायिक महाविद्यालयांपैकी दिनांक २४ नोव्हेंबर, २००१ पूर्वीच्या विधी महाविद्यालयांना ही अनुदान प्राप्त झाले असून ४७ वर्षांपासून एकाही विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना अनुदान प्राप्त झालेले नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील २००१ पूर्वी स्थापना झालेल्या एकूण ८९ शिक्षणशास्त्र (बी.एड.) महाविद्यालयांना शासनामार्फत १००% अनुदान तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२४-११-२०२३) :** (१) दि. १७.५.२००१ पासून कायम विनाअनुदानित धोरण स्विकारण्यात आले आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) सदर महाविद्यालयांना देण्यात आलेली मान्यता कायम विनाअनुदानित तत्वावरील असून सन २००१ पासून शासनाने कायम विनाअनुदान धोरणाचा स्विकार केलेला आहे. ही बाब विचारात घेता राज्यातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना अनुदान देय ठरत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रत्नागिरी- कोल्हापूर-नागपूर महामार्गाच्या चौपदरीकरणाबाबत

**(३५) ६९३०७ (३०-०८-२०२३). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी- कोल्हापूर-नागपूर महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी दोन हजार ११४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून कामास सुरुवात केली आहे, हे खरे आहे काय;
(२) असल्यास, रत्नागिरी- कोल्हापूर-नागपूर या महामार्गाच्या कामाचे थोडक्यात स्वरूप काय आहे तसेच सदर महामार्गापैकी कोल्हापूर-रत्नागिरी राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, सदर मार्गाचे काम किती कालावधीत पूर्ण होणार आहे तसेच रस्ता वाहतुकीसाठी प्रत्यक्षात केव्हा पासून कार्यान्वित करण्याचे शासनाने निश्चित केले आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-०१-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.
सदर कामाकरिता एकूण रु.२७५५कोटी इतका निधी मंजूर आहे.
(२) व (३) रत्नागिरी-कोल्हापूर राष्ट्रीय महामार्ग १६६ कि.मी ०.०० मिऱ्या ते कि.मी. १४५.३३ चोकाक या लांबीमध्ये चौपदरीकरणाचे काम एच.ए.एम.(हॅम) तत्वावर सुरु आहे. सदर प्रकल्प तीन पॅकेजमध्ये विभागलेला असून माहे मे २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रावणवाडी- बिर्सी-कामठा-आमगाव (जि.गोंदिया) या राष्ट्रीय महामार्गाची दुरवस्था झाल्याबाबत

**(३६) ६९३०९ (३०-०८-२०२३). श्री.सहसराम कोरोटे (आमगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया जिल्हा अंतर्गत आमगाव विधानसभा क्षेत्रातील रावणवाडी- बिर्सी - कामठा-आमगाव या राष्ट्रीय महामार्ग ३६५ लांबी २९ किलोमीटर असून सदर रस्ता गोंदिया बालाघाट रस्ता राष्ट्रीय महामार्ग ५४३ ला जोडलेला असून या रस्त्याला रावणवाडी, बिर्सी विमानतळ, आमगाव तालुका इत्यादी महत्वाची ठिकाणे जोडलेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची दुरवस्था झाल्याने अपघात होऊन जीवितहानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू रस्त्याचे रुंदीकरण व दुरुस्तीकरिता निधी उपलब्ध करण्यात आला आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२३-११-२०२३)** (१) रावणवाडी-बिर्सी-कामठा-आमगाव राज्यमार्ग क्र.३६५ हा २९ कि.मी. लांबीचा रस्ता गोंदिया बालाघाट राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४३ ला जोडलेला असून या रस्त्याला रावणवाडी बिर्सी विमानतळ, आमगाव तालुका इत्यादी महत्वाची ठिकाणे जोडलेली आहे, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही,
(३) सदर रस्त्यावर कि.मी. १०/०० लांबीत रक्कम रु.४.५५ कोटी किमतीचा रस्ता सुधारणा करणेची मंजूर कामे प्रगतीत असून सप्टेंबर २०२४ पर्यत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तसेच रक्कम रु. २ कोटीचा रस्ता मजबुतीकरण करणेचे मंजूर कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण करुन लवकरच काम हाती घेण्याचे नियोजन आहे.
हायब्रीड ॲन्युटी योजनेअंतर्गत सदर रस्त्याचे रुंदीकरण व सुधारणा करणे या कामाकरिता सविस्तर प्रकल्प अहवाल बनविणे करिता दि.०८-१०-२०२३ रोजी सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे. अहवालातील प्राप्त निर्ष्कर्षानुसार पुढील कार्यवाही करणेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खरोळा फाटा ते पानगाव (ता.रेणपूर, जि.लातूर) या राष्ट्रीयमहामार्गा दुरुस्ती व सिमेंट कॉंक्रीटीकरणाच्या कामांबाबत

**(३७) ६९३३४ (३१-०८-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खरोळा फाटा ते पानगाव (ता.रेणपूर, जि.लातूर) या राष्ट्रीय महामार्गाची (मार्ग क्र.३६१ एच) दुरुस्ती व सिमेंट

कॉंक्रीटीकरणाच्या कामास प्रशासकीय मान्यता अद्यापपर्यंत मिळाली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अपघात होऊन एका लहान मुलाचा माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान च्या चौथ्या आठवडयात मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रस्त्याचे काम तातडीने सुरु करण्यासाठी स्थानिक नागरीकांनी माहे मे, २०२३ च्या पहिल्या आठवडयात रस्ता रोको व गाव बंद आंदोलने करुन जिल्हाधिकारी, लातूर यांना निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन सदर रस्त्याचे काम तातडीने सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (२३-११-२०२३) :** (१) हे खरे नाही, सदर कामाचे कार्यारंभ आदेश देण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(२) हे खरे नाही,
पोलिस विभागाचे अहवालावरुन अशा प्रकारचा कोणताही अपघात झालेला नाही
(३) हे खरे नाही,
(४) या कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण झालेली असून कार्यारंभ आदेश दिल्यानंतर कॉंक्रीटीकरणाचे काम सुरु होईल. सद्य:स्थितीत सदर रस्ता खडडे भरुन वाहतूकीसाठी सुस्थितीत राखण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई – अहमदाबाद येथील राष्ट्रीय महामार्गाची दुरवस्था झाल्याबाबत

**(३८) ६९४४१ (३१-०८-२०२३). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-अहमदाबाद (जि.पालघर) राष्ट्रीय महामार्गाची दुरवस्था झाल्याची बाब माहे जून, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र आणि गुजरात राज्यातील रस्त्याला समान टोल आकारला जात असतांना महामार्ग प्राधिकरणाकडून महाराष्ट्राच्या सीमेपासून गुजरात राज्यात जाणारा रस्ता सुंदर व सुबक बनविण्यात येतो परंतु गुजरात सीमेवरून महाराष्ट्रात येणाऱ्या रस्त्याला अनेक सोयीसुविधापासून वंचित ठेवण्यात येत असून येथे कोणत्याही ( रेडियम दिशादर्शक फलक न लावणे व अन्य.) सुविधा देण्यात येत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याची दुरवस्था झाल्याने येथे अपघात होऊन निष्पाप नागरिकांचा बळी जात असल्याने राज्य शासनाच्या रस्ते विभागाने आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने रस्त्याच्या सुविधांचा आढावा घेतला आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या रस्त्यांवर मृत व जखमी झालेल्यांच्या कुटुंबियांना तात्काळ आर्थिक मदत देऊन रस्ते दुरुस्त होईपर्यंत टोल बंद ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-०१-२०२४) :** (१) सदर महामार्ग भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारित येतो. संततधार पावसामुळे मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर काही भागात खड्डे तयार झाले आहे व वियंरिग कोर्स खराब झालेला आहे. रस्त्या करीता नेमण्यात आलेल्या देखभाल एजन्सीकडून खड्डे भरण्याचे काम केले जाते.
(२) राष्ट्रीय महामार्ग -४८ (कि.मी. १२१) चा संपुर्ण महाराष्ट्र विभागाचा व्हाईट टॉपिंगसाठी निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. साईन बोर्ड, डिलीनेटर्स व इतर सुरक्षा उपाय करण्याचे काम देखभाल एजन्सीव्दारे केले जाते . तसेच राष्ट्रीय महामार्ग-४८ चा महाराष्ट्र विभागात १० फूट ओव्हर ब्रिज चे काम सुरु करण्यात आले आहेत. आणि ६ व्हेइक्युलर अंडर पासेस मंजूर असून त्यापेकी ३ व्हेइक्युलर अंडर पासेस चे काम सुरुकरण्यात आले आहे.

(३) वर नमुद केल्याप्रमाणे, रस्ता वापरकर्त्यांसाठी रस्त्यांची परिस्थिती आणि सुविधा अपग्रेड केल्या जाणार आहेत. तसेच राष्ट्रीय महामार्ग-४८ वर घडणाऱ्या घटनांसाठी, ०२ गस्त घालणारी वाहने, ०२ रुग्णवाहिका आणि ०२ क्रेन पीडितांना तात्काळ मदत देण्यासाठी आणि वाहतूक कोंडी टाळण्यासाठी महामार्ग मोकळा करण्यासाठी तैनात आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दर्यापूर (जि.अमरावती) येथील अल्पसंख्यांक बहुल ग्रामीण क्षेत्रात मूलभूत/पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३९) ६९४७३ (३१-०८-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दर्यापूर (जि.अमरावती ) मंतदारसंघात अल्पसंख्यांक समाजाची मोठ्या प्रमाणात संख्या असून शासन निर्णय क्रमांक ग्राक्षेवि - २०२१ /प्र. क्र. ८३/का-९ दिनांक ३१ मार्च, २०२२ नुसार दर्यापूर मतदारसंघातील अल्पसंख्यांक बहुल ग्रामीण क्षेत्रात मूलभूत/पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी रुपये १०० लक्षच्या विकास कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त असून सदर विकास कामांवर स्थगिती असल्याने सदर कामाची प्रक्रिया प्रलंबित असल्याचे माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामे होणे अत्यंत आवश्यक असल्याने शासनाने याबाबत चौकशी करुन सदर स्थगिती रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (१९-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) शासन निर्णय दिनांक ३१ मार्च, २०२२ अन्वये मंजूर विकास कामांपैकी ज्या विकास कामांची निविदा प्रक्रीया पूर्ण झालेली नाही किंवा सदर कामांचा कार्यारंभ आदेश देण्यात आलेला नाही, अशा कामांची सद्यस्थिती तपासून स्थगिती बाबत निर्णय घेण्याचे प्रस्तावित होते. तथापि, सदरची स्थगिती सरसकटपणे उठविण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील रिंग रोड प्रकल्पाला निधी उपलब्ध करुन प्रकल्प सुरु करण्याबाबत**

**(४०) ६९६७७ (३१-०८-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील रिंग रोड प्रकल्पाला शासनाकडून मान्यता दिल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदर रिंग रोड प्रकल्पाला आवश्यक तो निधी उपलब्ध करुन प्रकल्प सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१८-१२-२०२३) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
दि.०६/०९/२०२१ रोजी पुणे रिंगरोड प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.
(२) पुणे चक्राकार पश्चिम मार्गाच्या भूसंपादनासाठी राज्य शासनाने दि.०८/०३/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्व्ये रु.३५०० कोटी इतके कर्ज हुडको या वित्तीय संस्थेकडून घेण्यास मान्यता दिली आहे. तसेच, शासन ज्ञापन क्रमांक बीजीएम-२०२३/ प्र.क्र.०६/२३/अर्थ-१,दिनांक-३१.०३.२०२३ अन्वये रुपये १००० कोटी इतका अर्थसंकल्पात निधीही महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास वितरीत केला आहे. भूसंपादनाचे निवाडे (Awards) तयार करण्याचे काम प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चिपळूण तालुक्यातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाची प्रलंबित कामे तातडीने होणेबाबत

**(४१) ७०११९ (३१-०८-२०२३). श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम संथ गतीने सुरु असून अजूनही केवळ चिपळूण हद्दीतील ८० टक्केच काम पूर्ण झाले आहे परंतु महामार्गावरील गटार व मोऱ्यांची कामे अद्याप प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) पावसाळयामुळे महामार्गावरील गटारे व मोऱ्यांचे काम अपूर्ण असणे तसेच काही ठिकाणी नुसतेच खड्डे खोदून ठेवल्यामुळे यावर्षीही महामार्गावर पावसाचे पाणी साचण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील वर्षी महामार्गावर पाणी साचल्याने अनेकांच्या राहत्या घरात पाणी शिरुन प्रचंड नुकसान झाले असणे तसेच अद्याप ही काही ठिकाणी महामार्गालगतच्या भागातील पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी गटारांची व्यवस्था नसल्याने नागरीकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्गावरील चिपळूण हद्दीतील गटाराचे काम व जागोजागी मोऱ्यांचे अर्धवट असलेले काम पूर्ण होणेसंदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२३-११-२०२३) :** (१) चिपळूण हद्दीमधील परशुराम घाट ते आरवली भाग क्र.५ चे काम ९० टक्के पूर्ण झालेले असून गटारे व मोऱ्यांची कामे पुर्ण झाली आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) सदर कामे पूर्ण असल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) लागू नाही.

---

### पंचगंगा नदीचा काठ असुरक्षित असल्याबाबत

**(४२) ७०३३३ (३१-०८-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर, सांगली व सातारा येथे सन २०२१ मध्ये आलेल्या महापुरामुळे पंचगंगा नदीच्या काठावर संरक्षक भिंती बांधणे, बोगदे काढणे आणि बास्केट ब्रिजची उभारणी करण्यात येणार असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संरक्षक भिंती बांधणे, बोगदे काढणे आणि बास्केट ब्रिजची उभारणी करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (३०-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) इचलकरंजी शहराजवळ पंचगंगा नदीच्या पात्रापासून अंदाजित ६००.०० मी अंतरावर रामा क्र.१९२ या रस्त्यावर

सा.क्र. किमी ६३/६०० या यशदा पूल ठिकाणी बॉक्स सेल बांधणे (पूर नियंत्रण योजना) या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीत असून लवकरच हाती घेण्याचे नियोजन आहे.

तसेच कोल्हापूर जिल्हयातील अस्तित्वात असणारे पूलांच्या पोहचमार्गाच्या भरावामुळे पूर परिस्थितीमध्ये पाणी जलद गतीने निचरा होणेसाठी भरावामध्ये पाईप बसविणेचे एकूण ३३काम निधी, निकष व प्राधान्य क्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

शिरोळ तालुक्यातील अर्जुनवाड ते हेरवाड दरम्यान कि.मी.१७३/८०० ते १९५/९१० या २२.११ किमी लांबीमध्ये अस्तित्वातील रस्त्याचे रूंदीकरणाचे काम करणेत आले असून त्यामध्ये पावसामुळे अथवा पुरामुळे येणारे पाणी जास्तीजास्त प्रवाहीत करणेसाठी ८ मो-यांचे रूंदीकरण व २५ नवीन मो-यांचे बांधकाम केले आहे व ५ लहान पुलांची आवश्यक दुरूस्ती केली आहे.

तसेच बास्केट ब्रिजची उभारणी करणेबाबतची तरतूद ही कागल-सातारा सहापदरीकरण कार्यामध्ये केलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नांदगाव-मनमाड राष्ट्रीय महामार्गाचि वरील पथदीवे सुरु करण्याबाबत

**(४३) ७०४३६ (३१-०८-२०२३). श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव-मनमाड राष्ट्रीय महामार्गाचे (रा.म.क्र. ७५३३) सिमेंट कॉक्रीटचे काम पूर्ण झाले असून गेल्या आठ महिन्यांपासून रस्त्याच्या मधोमध लावण्यात आलेले पथदीवे अद्यापही सुरु करण्यात आलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गावर पादचारी व वाहनधारकांना अंधाराचा सामाना करावा लागत असून येथील पथदीवे तातडीने सुरु करण्यात यावे अशी मागणी स्थानिक नागरीकांसह समाजसेवकांकडून मुख्य कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, नाशिक यांच्याकडे माहे मे, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाव्दारे करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर महामार्गावरील पथदीवे तातडीने सुरु न केल्यास आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त महामार्गाचे काम पूर्ण होऊन आठ महिन्याचा कालावधी उलटून गेला तरीही अद्यापपर्यंत पथदीवे सुरु न करण्याची कारणे काय आहेत व सदर पथदीवे तातडीने सुरु करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच केलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२३-११-२०२३) :** (१) हे खरे नाही, सद्यस्थितीत राष्ट्रीय महामार्ग क्र.७५३ जे वर बसविलेले पथदिवे नियमित सुरु आहेत.

(२) होय,

(३) होय,

(४) कंत्राटदाराने पथदिवे बसविण्याचे काम माहे डिसेंबर २०२२ मध्ये पूर्ण केले होते व ज्यावेळी एसएलई-डीसीएल यांचेकडे वीज जोडणी मिळण्यासाठी अर्ज केला होता. पथदिव्यांची लांबी व त्यासाठी लागणारा जास्तीचा वीजपुरवठा तसेच उन्हाळामुळे वीजेचा पुरेसा दाब उपलब्ध नसणे इ. कारणामुळे माहे जुलै २०२३ मध्ये मागणी पत्रास उशीराने मंजूरी मिळून वीज जोडणीचे काम पुर्ण झाले आहे. सद्यस्थितीत सर्व पथदिवे नियमित सुरु आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सेलू ते पाथरी (जि.परभणी, ता.सेलू) येथील उड्डाणपुलाच्या कामाबाबत

**(४४) ७०६७१ (३०-०८-२०२३). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेलू (ता.सेलू, जि.परभणी) हे निजामकालीन रेल्वे स्टेशन जवळ सेलू-पाथरी रस्त्यावर शहरानजीक रेल्वे गेट असून रेल्वेची ये-जा होताना सदर गेट बंद करण्यात येत असल्याने वाहतूकीची कोंडी होऊन प्रवाशांना त्रास होत अयल्स्समुळे येथे उड्डाणपुल बांधण्याची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील उड्डाणपुलाचे (ROB) चे काम हे रेल्वे व महाराष्ट्र शासन यांच्या (MRIDCL-JV of Maharashtra & Railway Infrastructure Development Corporation Ltd.) मार्फत प्रस्तावित करण्यात आले असून MRIDCL यांनी उड्डाणपुलाचे अंदाजपत्रक तयार केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सद्य:स्थितीत अंदाजपत्रक मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग (सा.बां.), नवी मुंबई यांचेकडून दि.२९ ऑगस्ट, २०२२ च्या पत्रान्वये प्रादेशिक अधिकारी, रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय (MOR&TH), कोकण भवन,नवी मुंबई यांना मंजुरीसाठी सादर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी अंदापत्रकास मंजूरी मिळून सेलू-पाथरी रस्त्यावरील उड्डाणपुलाचे बांधकाम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१९-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सदर कामाचे अंदाजपत्रक मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग (सा.बां) विभाग मुंबई यांनी प्रादेशिक अधिकारी, रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय मुंबई यांना पाठविण्यात आले असता त्यांनी सुधारीत गाळेरचनेनुसार सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन फेरसादर करण्यास सुचविले आहे. त्यानुसार सुधारीत गाळेरचनेनुसार सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन फेरसादर केले आहे. सद्यस्थितीत अंदाजपत्रकाची तांत्रीक तपासणी प्रगतीत आहे.
(५) लागू नाही.

---

## वारजे (जि.पुणे) येथील महामार्ग खचल्यामुळे दोघांचा मृत्यू झाल्याबाबत

**(४५) ७०८७१ (३१-०८-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वारजे (जि.पुणे) येथे ढोणे वाडा हॉटेलसमोर ओढ्यावरील पुलाचे काम सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील महामार्ग खचल्यामुळे अपघात होऊन दोन निष्पाप नागरीकांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ढिकाणी वाहतुक कोंडी होत असून यामुळे दिनांक ६ जून, २०२३ रोजी वा त्या सुमारास एका महिलेचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित ठेकेदार व अधिकारी कर्मचारी यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२३-११-२०२३) :** (१) सदर राष्ट्रीय महामार्ग भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारित येतो. ढोणे वाडा हॉटेलसमोर ओढयावरील पुलाचे काम सुरु आहे, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही,
माती ढासळून रस्ता खचल्यामुळे अपघात होऊन दोन निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला.
(३) वाहतूक कोंडीमुळे महिलेचा मृत्यू झाला हे खरे नाही.
(४) दि.६.६.२०२३ रोजी रात्री ९.२० च्या दरम्यान मुठा नदी पुलावर अज्ञात वाहन चालक भरधाव वेगाने धडक देवून दुचाकीवरील महिलेस जबर जखमी करुन निघून गेला व उपचारापूर्वी त्या महिलेचा मृत्यू झाल्याची बाब पोलिस विभागाचे डीसीआर मध्ये नमूद आहे. त्यामुळे ठेकेदार व अधिकारी यांचेवर कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) लागू नाही.

---

**मुंबई- बडोदा या महामार्गाच्या बांधकामाबाबत**

**(४६) ७११४६ (३१-०८-२०२३). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-बडोदा (जि.पालघर) महामार्गाचे काम गत वर्षभरापासून युध्दपातळीवर सुरु असून या महामार्गाच्या आड येणारे लहान, मोठे नैसर्गिक नाले पावसाळ्यात प्रवाहित राहण्यासाठी कुठलीही उपाययोजना न करता ते बुजविण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे पावसाळ्यात पाणी तुंबून शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होणार असल्याने नैसर्गिक नाले पुर्ववत करण्याची मागणी शेतकऱ्यांनी संबंधित ठेकेदार व विभागीय अधिकारी यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०४-१२-२०२३) :** (१) सदर महामार्ग केंद्र शासनाचे अधिपत्याखालील भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारित येतो,
(२), हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(३),(४) शेतकऱ्यांचे लेखी निवेदनासंदर्भात संबंधित कंत्राटदार व स्वतंत्र अभियंता यांचेकडून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, यांनी अहवाल मागविला. पावसाच्या पाण्याच्या योग्य निचरा होण्यासाठी महामार्गावर आवश्यकतेनुसार कल्व्हर्ट बांधण्यात आले आहेत. पावसाळयामध्ये ते सुस्थितीत राखण्यात येत असून सद्यस्थितीत पाण्याचा निचरा व्यवस्थित होतो व पाण्याच्या निचऱ्याची कोणतीही समस्या उद्भवली नाही. लागू नाही.

---

**राज्यातील मुंबईसह स्वायत्त महाविद्यालयांचा आढावा घेण्याबाबत**

**(४७) ७११७७ (०१-०९-२०२३). श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मुंबईसह स्वायत्त महाविद्यालयांचा आढावा घेण्याचे आदेश मा.मंत्री उच्च व तंत्र शिक्षण यांनी माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान मुंबईत झालेल्या एका बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.मंत्री उच्च व तंत्र शिक्षण यांनी आदेश देऊन ६ महिन्यांचा कालावधी उलटून गेला तरीही अद्याप स्वायत्त महाविद्यालयांचा आढावा घेण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०६-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांनी दिनांक ३१.०५.२०२२ रोजीच्या बैठकीत स्वायत्त महाविद्यालयांच्या प्रश्नांबाबत समिती नेमणेबाबत निर्देश दिले होते.

(२) व (३) हे खरे नाही. स्वायत्त महाविद्यालयांच्या प्रश्नांबाबत संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीच्या तीन बैठका घेण्यात येवून शासनास शिफारशी सादर करण्यात आल्या आहेत. सदर शिफारशीवर कार्यवाही विचाराधिन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बीड शहरामध्ये अल्पसंख्यांक समाजाकरीता उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थांसाठी वसतिगृह सुरु करणेबाबत**

**(४८) ७१४२२ (३१-०८-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि.बीड) विधानसभा मतदार संघातील अंबाजोगाई हे शैक्षणिक व विद्येचा वारसा असलेले शहर असून तेथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अभियांत्रिकी महाविद्यालय, कृषि महाविद्यालय तसेच अनेक शैक्षणिक संस्था असल्याने सदरहू शहर परिसरातील केज, परळी, धारुर, माजलगाव या तालुक्यातील व ग्रामीण भागातील मुले व मुली मोठ्या प्रमाणात शिक्षणासाठी येणाऱ्या अल्पसंख्यांक मुला / मुलींचे नवीन अद्ययावत वसतिगृह मंजूर करुन निधी उपलब्ध करून देण्याबाबतचे निवेदन तेथील लोकप्रतिनिधींनी अल्पसंख्यांक मंत्री यांना दिनांक १० ऑगस्ट,२०२० रोजी वा त्या सुमारास दिले आहे. तथापि, अद्याप त्यावर कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावित जागेच्या वसतिगृहासाठी बीड शहरात किती शैक्षणिक संस्था आहे, त्यामध्ये शिक्षण घेणारे किती अल्पसंख्यांक विद्यार्थी आहेत त्याबाबतचा तपशील अवगत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्ताव दीर्घकाळापासून प्रलंबित असल्याने याबाबतीत शासनस्तरावर, जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी, व मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.बीड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमीक) बीड यांच्याशी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बीड नगरपरिषदेच्या मालकीची किल्ला मैदान येथील जागा वसतिगृहासाठी सुयोग्य असल्याचे तर डाक बंगल्याची जागा वसतिगृहासाठी उपलब्ध होवू शकते असे निदर्शनास आले आहे. तसेच सदर जागेवर आरक्षण आहे किंवा नाही हे देखील अवगत होत नाही. बीड शहरातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था/तंत्रनिकेतन संस्था यांच्या परिसरात वसतिगृहासाठी जागा उपलब्ध होवू शकते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त ठिकाणी वसतिगृह बांधण्यासह निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०१-१२-२०२३) :** (१) नाही,

सदर निवेदन प्राप्त झालेले असून त्यावर कार्यवाही झालेली आहे.

(२) नाही

(३) होय

(४) (५) व (६) बीड येथील किल्ला मैदान येथील नगर परिषदेच्या मालकीची डाक बंगल्याची जागा अल्पसंख्याक समाजातील मुलींच्या वसतिगृहासाठी देण्यास बीड नगर परिषद, बीड यांच्या ठरावानुसार मान्यता दिली आहे. सदर जागा महसूल विभागाकडे प्रत्यार्पित करणेबाबत तसेच जागेच्या मिळकत पत्रिकेवर अल्पसंख्याक विकास विभागाचे नाव लावण्याची कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांना सचिव (अ.वि.वि.) यांच्या स्तरावरुन दि १२/७/२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

---

## तळेगांव ते द्रुगवाडा (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील शेतकल्याच्या वहिवाटीच्या रस्त्यावर रपटे व पूल बांधणेबाबत

**(४९) ७१४३४ (३१-०८-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळेगांव (शा.पं.) ते द्रुगवाडा (ता.आर्वी, जि.वर्धा) झालेल्या सिमेंट रस्त्यामुळे वहीवाटीचे रस्ते पुर्णत: बंद झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना आपल्या शेतात जाण्याकरिता असलेल्या रस्त्यावर कंत्राटदाराने रपटे अथवा पाईपद्वारे पूल करून न दिल्यामुळे शेतकऱ्यांना शेती करण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तळेगांव ते द्रुगवाडा रस्ता शेत जमीनीपेक्षा उंच झाल्यामुळे शेतकऱ्यांना रस्त्याच्या खाली उतरून आपल्या शेताची वाहीपेरी करणे अशक्य झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत मंत्री महोदयांनी आश्वासन देवूनही अद्याप कोणतेही काम करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन शेतकऱ्यांना शेतात जाण्याकरिता वहीवाटीच्या रस्त्यावर रपटे व छोटे पुल तयार करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याचे थोडक्यात स्वरूप काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२३-११-२०२३) :** (१) हे खरे नाही,

ज्या शेतकऱ्यांच्या शेतात जाण्याकरीता रस्ते अस्तित्वात होते, त्या जोडरस्त्यांची सुधारणा करण्यात आलेली असून त्यामध्ये बदल अथवा ते बंद करण्यात आलेले नाहीत.

(२) शेतकऱ्यांना रस्त्यापासून ते शेतापर्यंत वहिवाटीकिरता पाईप टाकून पोचमार्ग करुन देण्यात आलेले आहेत.

(३) सदर रस्त्याचे बांधकाम हे अस्तित्वातील रस्त्याची सुधारणा असल्यामुळे वाहीपेऱ्याचे रस्ते उद्धवस्त होवून शेतकऱ्यांना रस्त्याच्या खाली उतरुन आपल्या शेताची वाहिपेरी करणेअशक्य झाले, हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात जाण्यासाठी त्यांचे मागणीप्रमाणे व आवश्यकतेनुसार आशाप्रकारचे एकूण ९३ रस्ते बांधून देण्यात आले आहेत. तसेच रस्त्याच्या कडेला शेतांमध्ये जाण्या-येण्याच्या दृष्टीने वहिवाटीकरीता शेतकऱ्यांना पाईप टाकून पोचमार्ग करुन देण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील हरिओम नगर मुलुंड पूर्व येथील रहिवाश्यांना टोल माफ करण्याबाबत

**(५०) ७१४७६ (३१-०८-२०२३). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हरिओम नगर, मुलुंड पूर्व ही वसाहत मुंबईतील मुलुंड-ठाणे हद्दीवर असून येथील रहिवाश्यांना मुंबईत येण्यासाठी टोल द्यावा लागतो, हे खर आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतच राहणाऱ्या रहिवाश्यांना टोल देणे योग्य की अयोग्य याबाबत पडताळणी करुन हरिओम नगर येथील नागरिकांना टोल माफ करण्याबाबत प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१८-१२-२०२३) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७.०६.२०१३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये दिनांक ०१ डिसेंबर, २०१३ पासून हरिओम नगर, मुलुंड (पूर्व) येथील रहिवाश्यांना त्यांनी आवश्यक कागदपत्रे पुरावा म्हणून दाखल केल्यानंतर पथकर

अधिसूचनेप्रमाणे मुलूंड (पूर्व) येथील टोल नाक्याकरीता सध्याचा मासिक पासचा दर कमी करुन तो फक्त त्या दराच्या २५ टक्के इतक्या सवलतीच्या दराने आकारण्यात उद्योजकाकडून E.T.C./R.F.I.D. देण्यात येईल, असा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार, सदर पथकर नाक्यावर सवलतीच्या दराने पथकर पासेस उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुबंई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुबंई.